Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 78 – 93
DOI: 10.5281/zenodo.8340559
Original Research Article

# हैदराबाद मुक्तीसंग्रामात मराठवाड्याचे योगदान

डॉ. शिवाजी सोमला पवार

संशोधन मार्गदर्शक, इतिहास विभाग, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर ता. भोकर जि. नांदेड ४३१८०१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: shivajipawar552@gmail.com

Received: 13 September, 2023 | Accepted: 15 September, 2023 | Published: 16 September, 2023

**महत्वाचे शब्द:** हैदराबाद मुक्तीसंग्राम, मराठवाडा, ब्रिटिश राजवट, निजाम, हैदराबाद संस्थान, महाराष्ट्र परिषद, मराठवाडा मुक्ती संग्राम, निजामकालीन मराठवाडा, निजाम राजवट, रझाकार

“आमचा लढा हिंदुस्थानच्या अखंडतेसाठी आहे. भारताच्या मध्यभागी ‘आजाद हैदराबाद’ ची आम्ही कल्पना देखिल करु शकत नाही. यासाठी न जनतेच समर्थन आहे न ऐतिहासिक कारण स्वा. सेनानी स्वामी रामानंद तीर्थ. (हैदराबाद मुक्तीलढयाचे नेते)”

## प्रस्तावना

भारतात ब्रिटिश राजवटीच्या सुमाराऱ्यास जवळपास 563 देशी राज्ये आणि संस्थाने होती.दक्षिण भारतात त्रावणकोर, बडोदा, कोल्हापूर, नागपूर आणि हैदराबाद ही पाच राज्ये होती. भारतातील प्रांताची पुनर्रचना होण्याचा अगोदर अस्तित्वात असलेल्या हैदराबाद संस्थानांचा संस्थापक म्हणजे औरंगजेबाचा उमराव गाजीउद्दीन फिरोजजंग याचा मुलंगा मीरकमरुद्दीन ऊर्फ निजाम उल्मुल्क याने 31 जुलै 1724 रोजी दक्षिणेत स्वतंत्र राज्यांची स्थापना केली. या राज्याच्या गादीवर वंशपरंपरेने होऊन गेलेल्या सत्ताधिशांना निजाम व आसफजाह या नावाने ओळखले जात असे. हैदराबाद राज्यात मराठवाडा, तेलंगण व कर्नाटक या प्रादेशिक विभागाचा समावेश होत होता. या हैदराबाद संस्थानात महाराष्ट्राच्या मराठवाड विभागातील औरंगाबाद, बीड, परभणी, नांदेड आणि उस्मानाबाद या जिल्हयांचा समावेश होता. हे जिल्हे दक्षिणेतील तेव्हाच्या औरंगाबाद सुभ्यात मोडत होते आणि चौथाई व सरदेशमुखी गोळा करण्याच्या हक्काव्यतिरिक्त मराठयांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अंमल या जिल्हयांवर मराठेशाहीचा अस्त होईपर्यंत कधीच नव्हाता.

1713 मध्ये पहिल्या निजामाची दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली आणि तेव्हाच त्याने मोगलांच्या दुर्लक्षतेमुळे दक्षिणेत आपले स्वतंत्र्य राज्य स्थापण्याचे ठरविले. दिल्ली दरबारातील गुंतागुंतीची परिस्थिती आणि मराठयांना लागलेले साऱ्या हिंदुस्थानच्या राजकारणाचे वेध यामुळे निजामाला आपली आकांक्षा पूरी करणे शक्य झाले. निजामाने दक्षिणेचा दुय्यम सुभेदार मुबारीजखान याचा साखरखेडयाच्या लढाईत पराभव केला. आणि हैदराबादच्या स्वंतत्र्य राज्याची स्थापना केली. दक्षिणेमध्ये आपले स्वातंत्र्य टिकवून धरण्यासाठी मराठयांना जसे निजामाच्या विरोधाला तोंड दयावे लागणार होते. तव्दतच आपल्या महत्वाकांक्षेच्या आड मराठयांचे स्वतंत्र अस्तित्व नेहमी येणार हे निजाम ओळखून होता. या कालखंडात मराठयांचे राजकारण फक्त निजामापुरतेच मर्यादित राहिले नाही. स्वराज्याचे साम्राज्यात रुपांतर झाल्यानंतर निजामसारखाच मराठयांचा संबंध, हिंदुस्थानातील आणि परकीय सत्ताबरोबर आला. मराठयांची जवळवळ शंभर वर्षे स्वातंत्र्याची वृध्दी करण्यात आणि ते स्वातंत्र्य टिकविण्यात एतद्देशीय आणि परकीय सत्तांबरोबर झगडण्यात गेली. मराठयांना निजामाचा नाश करण्याची संधी आलेली असताना त्यांनी त्या संधीचा फायदा का घेतला नाही, किंवा दक्षिणेत आपली बाजू बळकट करण्याचे सोडून उत्तरेचे राजकारण त्यांनी का केले, किंवा परकीय सत्ताबरोबर तोंड देताना मराठेशाहीच्या अखेरच्या कालखंडात त्याची ताकद कमी का पडली या आणि त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या इतर प्रश्नांची चर्चा आतापर्यत अनेक इतिहास ग्रंथामधून अतिश इत्यभूतपणे झालेली आहे. निजामाचे राज्य म्हणजे मराठवाडयातील बहुजन समाजाचे राज्य नव्हते. मराठवाडा हा अन्वयार्थाने देखील स्वतंत्र नव्हता आणि तसे बघितले मुत्सद्दीपणा, क्षात्रतेज, वीरवृत्ती वगैरे बाबतीत हैदराबादच्या गादीवर आलेले नंतरचे सर्व निजाम घराण्यातील पुरुष त्याच्या पासंगालाही पुरणारे नव्हते.18 व्या शतकाच्या उत्तरार्थापासून हैदराबादच्या निजामाना स्वत:च्या संरक्षणासाठी फ्रेंच अथवा इंग्रज यांची कास धरावी लागली. आपल्या स्वातंत्र्याचे त्यांनी बलिदान केले ते 12 ऑक्टोबर 1800 रोजी ईस्ट इंडिया कंपनीबरोबर तैनाती फौजेचा तह करुन परंतु 1803 मध्ये इंग्रज आणि मराठे यांच्यामधील युध्दात निजामाकडून मिळावे तसे सहकार्य इंग्रजांना मिळाले नाही त्यामुळे इंग्रजानी सैन्याची पुनर्रचना, सैन्याची संख्या 70,000 एवढी होती. 1857 सालच्या स्वातंत्र्य समरापर्यतच्या म्हणजे निजामाची फौज पुनर्रचित झाल्यानंतरच्या 40 वर्षाच्या कालखंडात हैदराबादमध्ये झालेली बंडे म्हणजे हैदराबादच्या जुलमी आणि बेजबाबदार राजवटीविरुध्द सर्वसामान्य जनतेने प्रकट केलेला असंतोष असे म्हणावयास काहीच हरकंत नाही. या बंडाचा उद्रेक प्रामुख्याने बीड, औरंगाबाद आणि नांदेड या जिल्हयात झाला.

**हैदराबाद राज्याचा इतिहास**

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत ब्रिटिशांच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला. देशी राज्ये व संस्थाने भारतीय संघराज्यात कशी विलीन करुन घ्यावयाची हा मोठा प्रश्न भारत सरकारपुढे निर्माण झाला. शेवटी भारताचे पंतप्रधान पंडित नेहरु आणि ग्रहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी बहुतेक संस्थाने भारतात विलिन करुन घेतली. परंतु हैदराबाद राज्याचा सत्ताधिश निजाम मीर उस्मान अली खान याने 11 जून 1947 रोजी आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले. निजामाने आपले राज्य स्वातंत्र राहणार असल्याचे घोषित केल्यामुळे भारत सरकार आणि हैदराबाद

राज्यातील जनतेपुढे मोठा पेंच व प्रश्न निर्माण झाला.[1] राज्यात 70 टक्के हिंदू, 18 टक्के दलित, 11 टक्के मुसलमान आणि 1 टक्के इतर लोक होते. परंतु निजामाची सत्ता जनतेसाठी अन्याची, अत्याचारी होती. हैदराबाद राज्य देशाच्या व दख्खनच्या मध्यभागी असलेले आणि देशात आकाराने दुसऱ्या क्रमाकांचे असलेले हे स्वतंत्र राज्य राहते देशाच्या व जनतेच्या हिताचे नव्हते. राज्यातील जनतेने विलिनीकरण करण्यासाठी अथवा निजामी राजवटीच्या जोखडातून मुक्ती मिळवून स्वतंत्र भारत सामील होण्यासाठी राजकीय संघर्ष, सामाजिक चळवळी, सशस्त्र उठाव अशा विविध मार्गानपी हा लढा लढला गेला. हैदराबाद मुक्तिसंग्रामचा हा लढा एकंदरच भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक तेजस्वी आणि रोमहर्षक अध्याय ठरेल. स्वातंत्र्योत्सुक जनतेविरुध्दचे दमनचक्र जेवढे प्रबळ तेवढाच जनतेचा प्रतिकार आणि त्याग प्रखर असल्याची साक्ष इतिहासांत वारंवार मिळते. शौर्य आणि बलिदानाचे उत्तुग मानदंड उभे करुन कार्यपूर्ती होताच प्रसिध्दीच्या झोतापासून स्वतःच दूर झालेले अनेक वीर या लढयाने दिले.[2]

हैदराबाद संस्थानाचे क्षेत्रफळ 82,313 चौरस मैल होते. तर काश्मिरचे क्षेत्रफळ 84,741 चौरस मैल होते. हैदराबाद संस्थापनात तेलंगण, कर्नाटक व मराठवाडा या तीन प्रदेशाचा समावेश होता. 1) तेलंगण क्षेत्रफळ 41502 चौ. मैल, लोकसंख्या 86,35,131 तर जिल्हे-1) हैदराबाद, 2) मेदक, 3) महबुबनगर, 4) निजामाबाद, 5) नलगोंडा, 6) वरंगल, 7) करीमनगर, 8) आदिलाबाद. 2) मराठवाडा-क्षेत्रफळ 27591 चौ.मैल,लोखसंख्या 52,19,528 तर जिल्हे-1) औरंगाबाद, 2) बीड, 3) परभणी, 4) नांदेड, 5) उस्मानाबाद. 3) कर्नाटक-क्षेत्रफळ 13605 चौरस मैल,लोकसंख्या 23,39654 तर जिल्हे 1) बिदर, 2) रायचूर, 3) गुलबर्गा. तर हैदराबाद संस्थानात पंधरा जिल्हे व एकशे सात तालूके होते. 'अतराफ बलदा' हा जिल्हा सर्फेरवास मध्ये सामील होता. या जिल्हयात अंबरपेठ, असफनगर, धारुर, मुक्रमाबाद (खडका), हुमनाबाद, मेडचल व शहाबाद असे सात तालूके होते. संस्थानात वरंगल, मेदक, औरंगाबाद व गुलबर्गा असे चार सुभे होते. औरंगाबाद सुभ्यात बीड, परभणी, नांदेड व औरंगाबाद हे चार जिल्हे व त्यामध्ये चोवीस तालूके होते.[3]

हैदराबाद संस्थानात 22,360 खेडी आणि 138 शहरे होती. 1167 जहागीरदार होते. 1941 च्या शिरगणतीनुसार या संस्थानाची लोकसंख्या 1 कोटी 63 लक्ष 38 हजार 534 होती.त्यामध्ये 25 लाख दलित होते.संस्थानात 70 टक्के हिंदू,18 टक्के दलित,11 टक्के मुसलमान व इतर 1 टक्के लोक होते.संस्थानात धर्मनिहाय लोकसंख्या हिंदू 1,33,09,649, मुस्लिम-20,97,475, खिस्ती-2,20,464 तर इतर 7,10,946 ऐवढी होती.[4] हैदराबाद प्रामुख्याने तीन भाषिकांचे मिळून झाले होते. तेलगू, मराठी, आणि कन्नड या त्या तीन भाषा होत. या खेरीज उर्दू बोलणारेही होते. तेलगू भाषिक-75 लक्ष 29 हजार 229, मराठी भाषिक 39 लक्ष 47 हजार 89, तर कन्नड भाषिक 17 लक्ष 24 हजार 180 आणि उर्दू 21 लक्ष 87 हजार 5 होती. विसाव्या शतकाच्या प्रारंभी म्हणजे इ.स.1901 पासून थेट सातव्या निजामाच्या म्हणजे मीर उस्मानअली खानाच्या कारकीर्दीपर्यंत (इ.स.1941 पर्यंत) हिदू,मुस्लिमांच्या लोकसंख्येत फरक 1901 मध्ये 88.6 टक्के तर मुस्लिमांचे 10.4 टक्के होते. 1911 मध्ये हिंदू 86.9 व मुस्लिम 10.3 टक्के,1921 मध्ये हिदू 85.4 व मुस्लिम 10.4,1931 मध्ये हिंदू 84.0 टक्के व मुस्लिम 10.6 आणि 1941 मध्ये हिदू 81.4 टक्के, मुस्लिम 12.8 टक्के असे झाले. 1941 साली शासकीय कागदपत्रांतून हिंदूचे प्रमाण अवघे 63.5 टक्केच दाखविण्यात आले तर हरिजन व

दलित हे हिंदू नव्हेत म्हणून 1941 च्या जनगणतेत त्यांची नोंद वेगळी करण्यात आली.शिक्षणाच्या क्षेत्रात केवळ भेदभावच नव्हता तर मुस्लिम राज्याची कल्पना प्रत्यक्षात आणण्याची कोशीश होती.शाळेत जाणाऱ्या मुलांची संख्या 1911 मध्ये हिंदू 3.8 टक्के, मुस्लिम 12.5 टक्के, 1921 मध्ये हिंदू 10 टक्के, मुस्लिम 46.2 टक्के, 1927-28 मध्ये हिंदू 12.2, मुस्लिम 54.6,1940-41 मध्ये हिंदू 17.1 टक्के तर मुस्लिम 77.1 टक्के अशी होती.[5]

सावकारीच्या धंदयातही मुस्लिमांना प्रयत्नपुर्वक वाव देण्यात आला. त्यासांठी अरब, रोहिले आणि पठाण यांना मुद्दाम आणविले गेले. सर्व संस्थानात अशा मुस्लिम सावकारांची संख्या 3106 होती तर मारवाडी सावकारांची 2131 हीच संख्या मराठवाडयात मुस्लिम सावकार 2581, मारवाडी 1429 आणि मराठा 1817 होती. सरकारी नौकऱ्यातील हिदू-मुस्लिम यांचे प्रमाण 1941 मध्ये मुस्लिमांची संख्या 1 लक्ष 12 हजार 737 होती तर हिंदूची 23 हजार 368 होती. लष्कर आणि पोलिसात मुस्लिम 54,149 तर हिंदू फक्त 6,495 आणि ईतर खात्याचे नौकऱ्यात मुस्लिम 58,588 आणि हिंदू 16,873 होती. तेलंगणमध्ये शेतीची रचना जमीनदारी पध्दतीची होती. मराठवाडा, कर्नाटकातील रयतावारीला काटशह म्हणून या भागात मोठया प्रमाणावर जहागिरी निर्माण करण्यात आल्या. हैदराबादच्या जमीनदारीच्या व जमीनदारांच्या अत्याचारांचा बोभाटा कम्युनिस्टांच्या हिसक तेलंगण लढयाने व इंतर आचार्य विनोबाच्या भूदान चळवळीने झाला. हैदराबाद संस्थानच्या एकूण क्षेत्रफळापैकी (82,698 चौ.मैल) 42 टक्के क्षेत्रफळ निरनिराळया जहागिरींनी व्यापले होते. जहागिरीची लोकसंख्या सर्व मिळून पन्नास लक्षावर होती त्याचे चार कोटी वार्षिक उत्पन्न होते.लहान-मोठया जहागीरदांराची संख्या 1167 होती.उत्पन्न एक लाखापैक्षा जास्त 19, एक लाखाऊन उत्पन्न कमी-15, पन्नास हजारावून कमी उत्पन्नाची संख्या 44, दहा ते पंचवीस हजारांपर्यतचे 109, एक हजार ते दहा हाजारांपर्यत चे 707 आणि दहा ते एक हजारापर्यंतचे 293 जहागीरदार होते. ज्यांना पूर्वीच्या वतनापोटी देशमुखी-देशपांडेगिरीची वर्षासने म्हणून रुसूम, यौमिये, माश, वजीफे मिळत असत.जहागीरदारांमध्ये सर्फेखास पायगा, जहागीर व संस्थाने असे चार प्रकार होते. सर्फेखासच्या एकूण क्षेत्रफळापैकी सर्वात जास्त भूभाग म्हणजे 3236 चौ.मैल, औरंगाबाद, बीड, परभणी व उस्मानाबाद या मराठवाडयाच्या जिल्हयात होता. दुसरा शमसुल-उमरा निजामाचा जावई झाला तर सातवा (अखेरचा) निजाम उस्मानअल्ली हा पायगा अमीरा चा जावई झाला. या अमीरापैकी शमसुल-उमरा (1848 ते 1849 इ.स.) आणि सर विकारुल-उमरा (1894 rs 1901 इ.स.) निजामाचे दिवाण होते.[6]

निजामाचे सर्फेखास आणि अमीरांचे पायगा यांच्यानंतर ज्या प्रमुख जहागिरी होत्या त्यांचा क्रम-सालारजंग, फखरुल मुल्क, खान खानान, महाराजा किशन प्रशाद, राजा रायरायन, राजा धरमकरण माथुर आणि नबाब शैकतजंग तर संस्थानाच्यामध्ये वनपर्ती, जटपोळ, गोपाळपेंठ, शिरनापल्ली, दमकोंडा, गदवाल, गरगुंटा, अश्वारावपेठ, अनागोंदी व सुरपूर यांचा समावेश होता. उस्मानअलीने आपले राज्य फार उत्तमरीतीने व आधुनिक पध्दतीने चालविले हा भ्रम डोक्यातून काढूनच टाकला पाहिजे. पहिल्यांदा त्याने दडपले ते नागरिक हक्क त्यासाठी 1921 मध्ये एक आदेश काढून सभा संमेलने, बैठकी, प्रवचने, मिरवणुकी यावर सक्त बंधने लादली. व्यायामशाळा, आखाडे, खाजगी शाळा, ग्रंथालये इत्यादी परवानगीवाचून काढू नयेत शी सक्ती करण्यात आली. लोकांना दडपून टाकण्याची निजाम अशा रीतीने शिकस्त

करीत होता. उस्मानिया विदयापीठाची स्थापना होण्यापूर्वी उर्दू माध्यमाचे मेडिकल स्कूल (इ.स. 1845), इस्लामी तत्वज्ञान व धर्म यांचे खास शिक्षण देणारे मदरसे निजामिया (इ.स.1833), उर्दू व इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणारे इंजिनियरिंग स्कूल (इ.स.1870), हैदराबाद कॉलेज (पुढे याचेच निजाम कॉलेज झाले इ.स.1878), लेखी परीक्षांचा कायदा (इ.स.1873), औरंगाबादेत पहिले औदयोगिक शिक्षणाचे स्कूल (इ.स.1891) इ.स. 1894 व शेतकरी स्कूल इ.स. 1892 ते औरंगाबादच्या मल्टसे फोकानिया (म्हणजे हायस्कूल) अशा प्रकारची शैक्षणिक तयारी झालेली होती.[7]

**निजाम काळातील मराठवाडा (इ.स.1724 ते 1948)**

मोगल बादशहाच्या दुर्बलतेचा आणि राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन दक्षिण भारतात हैदराबाद (भागानगर) येथे इ.स. 1724 मध्ये स्वतंत्र्य राज्याची स्थापना केली. निजामाच्या राज्यातच मराठवाडा समाविष्ट होता. एकूण 224 वर्षे हैदराबादच्या निजामाचे राज्य मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटकावर होते. हैदराबाद संस्थानात एकूण सात निजाम होऊन गेले. मीर कमरुद्दीन (चिनकुलिज खान,आसफ जहा,निजाम-उल्लमुल्क) निजाम पहिला-इ.स. 1724 ते 1748, नासिरजंग-इ.स. 1748-1750, मुजफ्फरजंग-इ.स. 1750-1751, सालाबतजंग इ.स. 1751-1763, दुसरा निजाम-निजाम-उल-मुल्क इ.स. 1763-1803, तिसरा निजाम सिकंदर अलीखॉ-इ.स. 1803-1829, चौथा निजाम-नबाब नासिरुदौला-इ.स. 1829-1857, पाचवा निजाम नवाब अफजलुद्दौला-इ.स. 1857-1869, सहावा निजाम-महबुब अलीखॉ-इ.स. 1869 -1911, सातवा निजाम मीर उस्मानअली-इ.स. 1911-1948 पर्यत निजाम राजवट होती.[8] बादशहा महंमदशाहाने निजामाची माळव्याच्या सुभेदारीवर नियुक्ती केली. यानंतर 15 मार्च 1719 रोजी निजामाने माळव्याकडे न जाता सरळ दक्षिणेची वाट धरली. त्याला दक्षिणेचा सुभेदार मुबारीज खान यांने रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु ऑक्टोबर 1724 मध्ये झालेल्या साखरखेडर्याच्या लढाईत निजामाने त्याचा पराभव केला. यानंतर महंमदशहा बादशहाने निजामाला पुन्हा दक्षिणेची सुभेदारी दिली. याचवेळी निजामाने मोगल बादशहाची दुर्बलता व राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन इ.स. 1724 मध्ये दक्षिणेत हैदराबाद (भागानगर) या ठिकाणी स्वंतत्र राज्याची स्थापना केली त्यावेळी मराठवाडयाची राजकिय, सामाजिक धार्मिक व आर्थिक परिस्थिती कसी होती.[9]

**निजामकालीन राजकीय परिस्थिती**

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला.हैदराबादचा निजाम इंग्रजानंतर त्याने आपले स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र, आझाद हैदराबाद कायम ठेवण्याची महत्वकांक्षा बाळगून होता. मराठी, कनडी व तेलगू या भाषिक जनता या संस्थानात गुलामीचे जीवन जगत होती. संस्थानात 23 हजार खेडी, 130 तालूके, 8 जिल्हे तेलगू भाषिक, 3 जिल्हे कानडी भाषिक तर 5 जिल्हे मराठी भाषिक अशी 16 जिल्हयांचा व चार सुभ्यात विभाजीत ही निजामी राजवट होती. त्यात 24591 चौरस मैलाचा मराठवाडा चा भाग होता. राज्याचे उत्पन्न 32 कोटीचे होते. हैदरबाद राज्यातील जहागिरदारांची संख्या 1,800 होती. त्याचे उत्पन्न एक हजारापासून ते एक कोटीपर्यत होते. निजाम राज्याचा इतिहास हा 1818 पासुन 1948 पर्यंत प्रतेच्या बंडाचा इतिहास होय. औरगाबादचे भिल्लांचे बंड (1827), नांदेड जिल्हयातील हटकरांचे बंड (1798-

1820), उस्मानाबाद जिल्हयातील देशमुखांची बंडे (1820), नानासाहेब पेशव्याच्या हस्तक बीडचा रंगराव रत्नाकर पागे हा बंडास प्रवृ्त्त करतो म्हणून त्याला काळा पाण्याची शिक्षा केली. 1867 मध्ये रामराव उर्फ जंगबहादूरने बीड जिल्हंयात बंडाचा प्रयत्न केला. मराठवाडयात 1857 ला बीड जिल्हयात बंड झाले. भारतात इंग्रजाविरुध्द स्वातंत्र्याची चळवळ फोफावून भारत स्वतंत्र झाला. परंतु निजाम राजवटी खालील भारतीय जनता पारतंत्र्यात होती.[10] तेव्हा निजामी राजवटीतून मुक्त होण्याच्या स्वतंत्र्य चळवळीचे नेतृत्व मराठवाडयाने केले. महाराष्ट्रातील कोणत्याही भागापेक्षा मराठवाडयात हुतात्म्यांची संख्या जास्त राहिली. जवळजवळ शंभरावर सशस्त्र कॅम्प उभे राहिले. आणि वीस-एकवीस हजार स्वातंत्र्य सैनिक बंदुका घेऊन लढले. 13 सप्टेबर 1948 रोजी जनरल जे. एन. चौधरी नेतृत्वाखाली भारतीय लष्कर संस्थानात घुसले आणि 17 सप्टेबर 1948 रोजी ही “ऑपरेशन पोलो” नावाची मोहिम पूर्ण झाली. या सर्व घडामोडी मागे आसफीया घराण्यातील निजामांची ध्येय, धोरणे व तात्कालीन परिस्थिती कारणीभूत होती. निजामाची विचारसरणी, सरंजामदारी आणि हुकुमशाही प्रवृत्तीची होती. त्यामुळे संस्थांनातील जनतेला राजकीय हक्क, अधिकार आणि स्वातंत्र्य असणे शक्यच नव्हते. राकिय दडपणाखाली असलेला समाज जागृत होण्यासाठी विसावे शतक उजडावे लागले. राजकिय चळवळ करण्यावर पूर्णपणे निर्बध होते.[11] गुस्मी 53 हया निजामाच्या कायदयानुसार हिंदूना सामाजिक व धार्मिक कार्यात परवानगी देण्यात आलेली नव्हती. त्यामुळे संपूर्ण हैदराबाद राज्य हे जनतेच्या कल्याणाचे राज्य न राहता गुलामी व कैदी जीवनमान जगण्यासारखी जनतेची दयनिय स्थिती झालेली होती. कंधार तालूक्याचा प्रसिध्द महसूल अधिकारी 'फरीद मिर्झा" यांने या राज्याबद्दल सांगतात की, “यह आझादी है,या दैनी गुलामी,” हया राज्यात सर्वसामान्य जनतेस गुलामापेक्षाही निकृष्ट जीवन जगावे लागत होते. राज्यातील अधिकारी कोणत्याही घटनेला संशयीत भूमिकेतूनच पाहात होते. “हैदराबाद संस्थानातील पोलिसांनी कॉग्रेस कमेटीचा झेंडा जाळून शेतक्ऱ्यांच्या परिषदेत सहभागी होणाऱ्या लोकांना निर्दयपणे मारुन बऱ्याच लोकांना जायबंदी केले होते.” प्रसिध्द समाजसेवक व गांधीवादी नेते जयप्रकाश नारायण म्हणतात, “निजाम मोर उस्मान अली हयाने दैविअधिकाराच्या सिंध्दांताप्रमाणे हुकुमशाहीच्या दबावाखली राहावे लागत होते. त्याने आपल्या राज्यांना लष्करांच्या साहयाने दहशत निर्माण करुन सामान्यांचे सार्वभौमत्व व स्वातंत्र्य पूर्णपणे नाकारलेले होते. लहरीनुसार राज्यकारभार हेच त्याच्या प्रशासनाची कृती होती. निजामाने ईश्वरदत्त सिध्दांतानुसार लोकांचे सार्वभौमत्व हिरावून घेतले होते,”[12]

**निजामकालीन धार्मिक परिस्थिती**

हैदराबाद संस्थानात हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम आणि पारसी इत्यादी धर्माचे लोक राहत होते. हिंदूची संख्या मराठवाडयांत जास्त होती. तर मुस्लिम संख्येने कमी असले तरी राजकीय व धार्मिक क्षेत्रात त्यांचेच वर्चस्व होते. हैदराबाद राज्यांत 12,774 मुस्लिमांच्या धार्मिक संस्था आणि 4000 मशिदी होत्या. त्यांचा राजवटीत निजामाने 3,10,944 रुपये अनुदान देण्यात येत असत. या उलट हिंदूच्या धार्मिक संस्थाना 1,12,870 रुपये अनुदान देण्यात येत होते. परंतू कालांतरांने ते ही बंद करण्यात आले. संस्थानात धार्मिक मंदिरे किंवा धार्मिक कार्यालये स्थापन करण्यासाठी सरकाराची पूर्व परवानगी घ्यावी लागत होती. हिंदू कार्यासाठी मराठवाडयात हेतुपुरस्कर परवानगी नाकारण्यात आली

होती. निजाम राजवटीत हिदूनां सरकारी नोकरीत कोणत्येही स्थान नव्होते. सैन्यातील नोकरीत 85.5% मुस्लिमांची भरती करण्यात आली होती तर केवळ 7.5% हिंदूना मुस्कीलने लष्करात भरती करण्यात आली तर मुस्लिम गुंड व अधिकारी यांच्या छळास आणि पिळवणूकीस जनता बळी पडत होती. मुस्लिम लोक स्वत: सामाजिक व धार्मिक क्षेत्रात अनेक सवलती व फायदे घेतले. निजाम राजवटीत हिंदूना बळजबरीने मुस्लिम करण्यात येत होते. त्यामुळे दिवसेंदिवस मुस्लिमांना धार्मिक जहालवृत्ती उदयास येत होती. मराठवाडयातील गुंजोटी आणि कल्याणी हया भांगातील दोन व्यक्तीनी धर्मातरास नकार दिल्यामुळे तुरुंगाच्या मुस्लिम अधिकाऱ्यांनी त्यांना ठार केले. अझर हुसेन हया पोलिस डी. जी. पी. अधिकाऱ्यांने सांगितल्याप्रमाणे नागप्पा दासय्या, वेदप्रकाश, ज्ञानप्रकाश या गुंजोटी आणि कल्याणीचे रहिवांशांनी धर्मातरास नकार दिल्यामुळे त्यांना तुरुंगातच ठार करण्यात आले. हिंदूना आपले धार्मिक कार्यक्रम सुध्दा जाहिरपणे न करता चारभिंतीच्या आतच करावा लागत होते. हिंदू न्यायाधिश गुंडेराव हरकारे यांना ही धार्मिक विधी व होमहवन हया वैयक्तिक धार्मिक विधी चारभिंतीच्या आत करण्यास सुध्दा परवानगी नाकरण्यात आली होती. पोलिस अधिकारी अझर हुसेन यांच्या आदेशावरुन "हिंदूचे धार्मिक साहित्यं जप्त करुन नष्ट करण्यात आले होते.

**निजामकालीन शैक्षणिक परिस्थिती**

या राजवटीच्या काळात उर्दू ही सरकार दरबाराची भाषा होती इस्लामी धार्मिक पध्दतीनुसार सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात सुध्दा उर्दू हीच महत्वाची भाषा मानली जात होती. शैक्षणिक धोरणात "कौकानिया रुसलीदीया व उल-उलमा हया पात्रता प्रमाण पत्राच्या पध्दती होत्या. उर्दूच्या डिप्लोमा पध्दतीत पास होणाऱ्या मुस्लिम विदयार्थ्यांनाच नोकऱ्या दिल्या जात होत्या. मुस्लिम विदयार्थीना उर्दू हया मातृभाषेतून पण गैर मुस्लिमांना इंग्रजी भाषा किंवा इतर माध्यम निवडण्यांची संधी नव्हती. केवळ मराठवाडयात आठच शाळा होत्या त्यामुळे हिंदूचे सुशिक्षितांचे प्रमाण फारच अल्प होते. इ.स. 1917 च्या आदेशानुसार राज्यात उर्दूभाषा सर्वच ठिकाणी लागू असून उस्मानिया विदयापीठात उर्दू हीच शैक्षणिक भाषा होती. मराठवाडयात नांदेड, जालना, बीड, परभणी, लातूर, औरंगाबाद व उस्मानाबाद येथे सरकारी हायस्कूल होते. संस्थानात मात्र हैदराबाद, वरंगल, औरंगाबाद, गुलबर्गा या ठिकाणीच इंटरमिजीएट महाविदयालय होती. राज्यात स्त्रियांच्या शिक्षणला प्रोत्साहन देण्यांत आलेले नव्हते. निजामी राजवटीत मध्ययुगीन व मुस्लिम धार्मिक परंपरेनुसार स्त्रियांनी केवळ चूल आणि मूल सांभाळावे व धर्माचे पठण करावे अशी प्रथा होती. या राजवटीत उच्चवर्गीय मुस्लिमांना शैक्षणिक दर्जाप्राप्त झाल्यामुळे प्रशासनांत सुध्दा त्यांचाच हस्तक्षेप होता शहरांत हिंदूची संख्या जास्त असून सुध्दा मुस्लिम संस्कृतीचा विशेष प्रभाव होता.[13] हिंदू निजाम सरकारला महसूल देणार नाहीत त्यामुळे हिंदूच्या धार्मिक मंदिरातील हालचालीवर नियंत्रण प्रस्थापित करावे." निजाम सरकारने हिंदूच्या सामाजिक व संस्कृतिक संघटनेवर राजकीय दृष्टिकोनातून अनेक बंधने लादली. हिंदूच्या मारवाडी मंडळ, कायस्थ संघटना, हिंदूसभा, हिन्दी पत्रकारसभा व ॲग्ले इंडियन संघटना ईत्यादीवर बंदी घालण्यात आली. राजवटीत मुस्लिकांच्या इत्तेहादुळ मुस्लिम संघटना. अंजूमन-तबलीग इस्लाम व महाराष्ट्र परिषदेवर बंदी घालण्यात आलेली नव्हती. कोणातही सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम जाहीर करावयास असल्यास आठ दिवस अगोदर सरकारची परवानगी घ्यावी लागत होती. इ.स.

1937-38 मध्ये नांदेड येथील मराठी सांस्कृतिक परिषदेची घटना नंतर ग्रहसचिवानी चार ते पाच वर्षानंतर अनेक निर्बध लावून हया परीषदेला मान्यता देण्यात आली. तुळजापूर येथील गुंडा गर्दीचे महत्वाचे उदाहरण म्हणजे हिंदूंना केवळ संशयावरुन अटक करुन त्यांना कैद केले होते. याचवेळी 200 मुस्लिमांनी बंदुका, तलवारी, लाठया काठया व चाकूव्दारे कैदेत असलेल्या हिंदूवर व पोलीसांवर हल्ला करुन त्यांना जखमी केले. मंदिर बांधणे,सांस्कृतिक संघटनेव्दारे धार्मिक व सामाजिक उत्सव साजरे करणे आणि शैक्षणिक संस्थाव्दारे शैक्षणिक प्रगती करणे हयासर्व बाबी निजाम राजवटीत अशक्य होत्या.[14]

**मराठवाडयाची आर्थिक स्थिती**

मराठवाडयांतील जमीनीवर निजाम सरकारने अनेक जाचक निर्बध लादून जमीन महसूल गोळा केला जात होता. मराठवाडयांतील शिंदीची झाडे जास्त असल्याने त्यांचे संरक्षण करुन त्यांचा आर्थिक फायदा घेत होते. मराठवाडयात नैसर्गिक साधन संपत्तीचा अभाव, पावसाचे कमी प्रमाण, जलसिंचनाचा अभाव, नैसर्गिक अवकपेमुळे निजामाच्या संरजामी राजवटीत 200 वर्षे राहीलेल्या ही प्रदेश आर्थिक दृष्टया मागासलेला होता. निजाम राजवटीत मदयव्यवसायाला सहज परवानगी दिली जात होती. शासनाच्या अंदाजानुसार 4,24,897 गॅलन दारु राज्यात विकली जात होती. त्यापैकी सर्वात जास्त दारु मराठवाडयात विकली जात होती. मराठवाडयात 1,50,000 लोकांना दारुच्या दुकानाचे परवाने देण्यांत आले होते. या दारुमुळे मराठवाडयांतील जनतेचे सामाजिक व सांस्कृतिक नितीमुल्यांचे अद:पतन झालेले होते. शेती ही निसर्गावर असून जलसाठा फार कमी होते. शेतीतपुरक व्यंवसाय म्हणून पशू पालन केले जात होते. यामुळे लोकांचा उदरनिर्वाहाचे ते एक साधन होते.[15]

**मराठवाडयाची सामाजिक परिस्थिती**

मराठवाडयात निजामकाळात समाजव्यवस्था ही वर्णव्यवस्था मुख्य आधार होती. ब्राम्हण, क्षेत्रिय, वैष्य आणि शूद्र या चार वर्णव्यवस्थेचा समाजात स्थान होते. या शिवाय समाजात मुस्लिम, ख्रिश्चन व पारसी लोकांचाही समावेश होता. ब्राम्हण, मराठा, महार, मांग, चांभार, ढोर, सुतार, लोहार, कोळी, सोनार, माळी आणि मुस्लिम या विविध जाती समानात होत्या. तर निजामकाळातील समाजात मुठभर मुस्लिम लोकांचा प्रभाव होता. हिंदू समाजातील जातींची क्रमवारी ठरलेली होती. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र आणि अतिशुद्र अशी त्याची क्रमवारी होती. मुस्लिम लोक हिंदू समाजातील लोकांचा स्पर्श टाळत असत. निजामकाळातील समाजव्यवस्थेत संयुक्त कुटुंब पध्दती अस्तित्वात होती. कुटुंबात स्त्रीयांना दुय्यम स्थान होते.[16] कनिष्ठ वर्गातील स्त्रीया पडदा वापरत नसत पण उच्च वर्गातील स्त्रीया पडदा वापरत असत. समाजात सती प्रथा, पडदा पध्दती व बहुपत्नीत्वाची आणि घटस्फोट घेण्याची प्रथा प्रचलीत होती. समाजात वेश्या व्यवसायात प्रंचलीत होता. स्त्रियांना आर्थिकदृष्टया पुरुषावर अवलंबून राहावे लागत होते. धार्मिक उत्सव आणि सणाचा दिवशी मात्र विविध प्रकारच्या पदार्थाचा आहारात समावेश केला जात असे. निजामकाळातील समाजात अस्पृश्यता पाळली जात होती. मुस्लिम समाजातील स्त्रिया सलवार, कमीज व ओढणी असे वेशभूशा करीत असत. पुरुष

पायजमा, चुडीदार पायजमा, कमीज आणि टोपी वापरत असत. याकाळात स्त्री आणि पुरुषांची केशभूषा आणि वेशभूषा साध्या स्वरुपाची होती. या राजवटीत विविध प्रकारचे खेळ, जुगार, कोंबडयाच्या झूंजी आणि बैलाच्या तसेच रेडयांच्या टक्करी तसेच गारुडी, मांग गारुडी, नागवाले, माकडवाले, अस्वंलवाले, डोबारी आणि कोल्हाटी या त्यापैकीच कलाकार जाती होत्या, कथा कादबंऱ्या, पुराणे व कुराण यांचे वाचन मनन व चिंतन करणे, भजन, किर्तन, नाटके, नृत्य, संगीत आणि शिकार करणे ही त्याकाळातील लोकांची मनोरंजनाची साधने होती. निजामकाळातील समाजात अनेक जाती-जमाती असल्यामुळे लोकांची मनोरंजनांची साधने होती. निजामकाळातील समाजात अनेक जाती-जमाती असल्यामुळे त्यांच्यात सामाजिक व धार्मिक ऐक्य राहाणे शक्य नव्हते. या राजवटीतील सर्वच राज्यकर्ते कट्टर धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यामुळे त्यांनी हिंदू समाजावर फार अन्याय अत्याचार केले. हिदू लोकांना मुस्लिम राज्यकर्ते व मुस्लीम समाजाने चांगली वागणूक दिली नाही. त्यामुळे हिंदू आणि मुस्लिम लोकांत ऐक्य राहू शकले नाही.[17]

**हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा**

हैदराबाद मुक्तिसंग्रामात मराठवाडा सर्वच क्षेत्रावर आघाडीवर होता. प्राचार्य नरहर कुरुंदकर म्हणतात की, हैदराबाद स्वातंत्र्य लढयात मराठवाडा अग्रेसर होता. जागृतीतही आणि पुढे सशस्त्र आंदोलनातही मराठवाडयातील अग्रगण्य पत्रकार अनंत भालेरावांच्या मते “मराठवाडयातील जनतेने अनंत हालअपेष्टा सहन करुन स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्कारणाऱ्या सरफेरोशांची उज्जल परंपरा निर्माण केली.” गोविंदभाई श्रॉफ यांच्या मते, “हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाची परिस्थिती अत्यंत वैविध्यपूर्ण, असाधारण आणि भिन्न-भिन्न घटनाक्रमातून वाटचाल करणारी होती. त्यामुळे या संग्रामाचे स्वरुप अव्दितीय असे आहे.” निजामी राजवटीविरुध्द तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे बरेच प्रयत्न 20 व्या शतकापर्यत झाले होते.[18] गुलामगिरीविरुध्द दंड थोपटण्याची धडपड 20 व्या शतकापर्यत बऱ्याच व्यक्तीनी केली. त्याचे व्यक्त स्वरुप म्हणजेच 1857 च्या उठावाचे पडसाद होते.

**आर्य समाज आणि हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम**

आर्यसमाज या संघटनेची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी 10 एप्रिल 1875 रोजी सर्वप्रथम मुंबई येथे केली. हैदराबाद संस्थानात इ.स. 1880 मध्ये मराठवाडयातील बीड जिल्हा ता. किल्ले धारुर येथे स्थापना केली. यासाठी पंडित भगवतीप्रसाद, कुंदन प्रसादजी, बाबुरावजी वैदय, बाबु गणेश सिंहजी वर्मा व बन्सीलालजी तिवारी वकील यांचे प्रयत्न कामी आले. इ.स. 1892 मध्ये या आर्यसमाजाच्या शाखेचे स्थलांतर हैदराबाद येथे “सुलतानबझार' या ठिकाणी करण्यात आले. 1930 मध्ये संस्थानातील प्रत्येक जिल्हयात आर्य समाजाच्या शाखा स्थापन करण्यात आल्या. आर्य समाजाने केलेल्या जनजागृतीमुळेच हिंदू समाज निजाम सरकारविरुध्द उद्रेकाने पेटून उठला. भाई बन्सीलालज यांनी "वैदिक संदेश" या नावाचे वृत्तपत्र सोलापूर प्रसिध्द करण्यास सुरुवात केली. सोलापूर येथून "सुदर्शन' हे आर्य समाजाचे मुखपत्र प्रसिध्द होत होते. हैदराबाद येथून "वैदिक आदर्श" हे साप्ताहिक पंडित नरेंद्रजी प्रसिध्द करीत होते. महात्मा अमर शहीद स्वामी श्रध्दानंदजी 1902 साली हैदराबाद संस्थानात आले. स्वामी श्रध्दानंदानी गांधीजीना महात्मा ही पदवी

दिली होती. आर्य समाजाने ठिकठिकाणी "आर्य कन्या पाठशाळा' स्थापन करुन स्त्रियांमध्ये जागृती घडवून आणली. आंतरजातीय विवाहस सर्वप्रथम आर्य समाजानेच प्रोत्साहन दिले. विधवांच्या पुनर्विवाहास चालना दिली. गणपतराव वैदय या ब्राम्हण आर्य समाजी व्यक्तीने "शांतीदेवी" या नांवाच्या अस्पृश्य स्त्रीबरोबर आंतरजातीय विवाह केला होता. पंडित मनोहर लालजी व पंडित शंकरदेव विदयालंकार हे जन्मत: हरिजन होते, परंतु त्यांनी ब्राम्हण मुलीबरोबर विवाह केला होता.[19] आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांनी गावोगाव फिरुन हिंदूना वैदिक धर्माच्या ध्वजाखाली सशस्त्र एकत्रित केले. खाकसार पार्टी, निजामसेना, रझाकार व इत्तेहादुळ पार्टीच्याकडून आक्रमण होणार असल्याची बातमी आली की आर्य समाज मंदीरातील घंटा वाजू लागे, घंटेचा आवाज ऐकताच प्रत्येक घरातील पुरुष व तरुणमुले काठया, कुऱ्हाडी, भाले, बर्च्या, तलवारी व बंदुका घेऊन त्यांना लढा देण्यास तयार राहत असत. आर्य समाजाचे वाढते कार्य पाहून 4 एप्रिल 1931 रोजी सुलतान बाझारच्या वार्षिक बैठकीत "केंद्रीय आर्थ सभेची स्थापना केली.आर्य समाजाचा वाढत्याप्रभाव पाहून सरकाने 12 एप्रिल 1934 रोजी एक परिपत्रक काढून सरकारचा परवानगी शिवाय प्रचार व उपदेश करु नये. तसेच 23 जानेवारी व 29 एप्रिल 1934 रोजी पुन्हा दोन परिपत्रके काढली. त्यामुळे त्याच्या निषेधार्थ 2 डिसेंबर 1934 रोजी आर्य समाजाने हैदराबाद येथे सत्याग्रह केला व सशस्त्र प्रतिकार करण्याची तयारी सुरु केली. 1936-37 साली तर सरकाने कार्यकर्त्यांना कोंडीत पकडून त्यांना जगणे असहय केले. त्यामुळे 23 सत्याग्रहीना तुरुंगातच मरण पत्कारावे लागले. हैदराबाद स्वातंत्र्य आंदोलनाचे अग्रणी सेनानी उदगीरचे आर्य समाजी "शामलालजी" होते. तर त्यांच्या खांदयाला खांदा लावून त्यांचे बंधू "बन्सीलालजी" हे कार्य करीत होते. 23 फेब्रुवारी 1937 रोजी वेदप्रकाशजी स्वातंत्र्य संग्रामातील ते पहिले हुतात्मा ठरतात.[20]

**हैदराबाद संस्थानात महाराष्ट्र परिषदांचे कार्य**

या संस्थानातील जनता सामाजिक व धार्मिक चळवळीतून एखादे राजकीय व्यासपीठ निर्माण करण्यासाठी धडपडत होती. 1923 मध्ये काकीनाडा येथे अखिल भारतीय कॉंग्रेसचे अधिवेशन झाले. त्यावेळी बॅरिस्टर राघवेंद्ररॉय शर्मा यांनी हैदराबाद संस्थानाची पहिली राजकीय परिषद आयोजित केली.लोकनायक माधव श्रीहरी ऊर्फ बापूजी अणे हे या परिषदेच्या अध्यक्षस्थानी होते. श्री वामणराव नाईक यांनी या परिषदेत बराच सहभाग नोंदविला. 1926 मध्ये मुंबईत परिषदेचे दुसरे अधिवेशन भरले तर 1928 मध्ये तिसरे अधिवेशन पुण्यात झाले. राघवेंद्र रॉय शर्मा यांनी पुढाकार घेतलयाबद्दल निजाम सरकारने हद्दपार केले. 5 मे 1928 रोजी हैदराबाद राजकीय परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात तात्यासाहेब केळकरांनी या संस्थानातल्या कार्यकर्त्यानी प्रथम राजनिष्ठेचा ठराव मंजूर करुन सनदशीर मार्गाने चळवळ सुरु करावी असा सल्ला दिला. परिषदेचे चौथे अधिवेशन अकोला येथे झाले.[21] त्या परिषदेचे अध्यक्ष बॅरिस्टर रामचंद्रराव नाईक होते तर सिराजुल हसन तिरमिजी हे स्वागताध्यक्ष होते. या परिषदेस मराठवाडयातील अनेक लोक उपस्थित होते. 1935 मध्ये 'निजाम सब्जेक्ट लींग" स्थापन करण्यात आली. आ. कृ. वाघमारे व अनंतराव कुलकर्णी यांनी 'महाराष्ट्र संघाची' स्थापना केली. आंध्र महासभेच्या शादनगर अधिवेशनात कर्नाटकासाठी 'कर्नाटक परिषद' व मराठवाडयात 'महाराष्ट्र परिषद' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. (1936) जून 1937 मध्ये परतूर येथे महाराष्ट्र परिषदेचे पहिले

अधिवेशन घेण्याचे ठरले. परंतू 1 जून ते 3 जून 1937 रोजी अधिवेशन झाले. अ. कृ. वाघमारे स्वामी रामानंद तीर्थ, दिगंबरराव बिदू, श्रीनिवासराव बोरीकर, गोविंदराव नानल, लक्ष्मणराव गानू, रामचंद्रराव अंतू, मुकुंदराव पेडगावकर, रंगनाथराव लाखकर, श्रीनिवासराव औठेकर, दाजीसाहेब मोहरीद, विश्वनाथराव कातनेश्वरकर, वासुदेवराव बरसोले, सखररम पत्की, डॉ.बाबूराव देशपांडे, रंगनाथराव बगाळे, काशिनाथराव आंबेकर पुढरी, गोविदभाई श्रॉफ, माणिकचंद पहाडे, चंदगुप्त चौधरी, इत्यादी पुढरी कार्यकर्ते आणि हजारो संख्येने लोक उपस्थित होते.[22] या परिषदेत नागरी हक्कांचा पुरस्कार आणि जमीनदारी व जहागीरदारी नष्ट करण्याच आग्रह प्रतिपादन करण्यात आला. गोविंदराव नानल यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न मांडून सहकारी चळवळीचा पुरस्कार केला. या परिषदेमुळे महाराष्ट्र परिषदेने कार्य संपूर्ण मराठवाडयात जोशने फोफावू लागले. मराठवाडयातील प्रामाणिक कार्यकर्त्याची एक फळी तयार झाली. महाराष्ट्र परिषदेचे लातूर अधिवेशन 2 जून 1938 रोजी घेण्यात आलेल्या संमेलनात महिलांचे मोठे योगदान प्राप्त झाले. अध्यक्षा सौ. काशीबाई किर्लोस्कर म्हणतात, "स्त्री ही जीवनातील अमोघ शक्ती आहे. मुलांना उत्तम प्रकारचे नागरिक बनविणे म्हणजे शील, देशाभिमान, मनौधैर्य, चिकाटी, स्वातंत्र्यप्रियता इत्यादी सदगुण त्यांच्यात भिनले पाहिजे. यावरच देशाची उन्नती उवलंबून आहे. कौटुंबिक सौख्य हे तिच्याच कर्तृत्वावर अवलंबून आहे. त्यांनी आपल्या व्याख्यानात सामाजिक सुधरणेवर भर दिला. आम्ही तात्विक नि केवळ बौध्दिक काथ्याकुटीत रुतून बसल्यामुळे क्रियादुर्बल होऊन पडले आहोत" असे सांगून सर्व भगिनींनी तात्काळ कार्यास लागावे असे आवाहन त्यांनी केले. उमरी जिल्हा-नांदेड अधिवेशन (दि.29 ते 31 मे 1941) रोजी महाराष्ट्र परिषदेचे तिसरे अधिवेशन सपन्न झाले. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री. देवीदासराव लव्हेकर तर अध्यक्ष श्री. काशीनाथराव वैª होते तर स्वामी रामानंद तीर्थ तुरुंगात असल्यामुळे उमरीच्या अधिवेशनाला हजर नव्हते. त्याचे प्रमुख असलेले गोविंदभांई श्रॉफ व आ. कृ. वाघमारे यांना शासनाने अटक करुन स्थानबध्द केले होते. अधिवेशनापूर्वी नांदेडला जातीय दंगा होऊन त्यात किसनसिंग हा तरुण हुतात्मा झाला होता. शासनाने महाराष्ट्र परिषदेचा समावेश जातीय संघटनामध्ये केला.[23]

महाराष्ट्र परिषदेचे चौथे अधिवेशन औरंगाबाद दि.1, 2 व 3 जून 1943 रोजी घेण्यात आले. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री. आ. कृ. वाघमारे तर अध्यक्ष हैदराबादचे डॉ. श्रीधर वामन नाईक होते. श्री गोविंदभाई श्रॉफ हे स्वागत चिटणीस होते. जेलमधून सुटका झालेले त्यात शामराव बोधनक, सुदामराव वकील, वामनराव बसे, रामकिशन धूत, रामचंद्रराव नांदापूरकर, आर. डी. देशपांडे, बिरधीचंद चौधरी, प्राणेशाचारी, श्रीनिवासराव हवालदार, अच्युतराव खोडवे, देवरामजी चव्हाण, मोतीलाल मंत्री, ज. प. मुळे, नागोराव पाठक, तात्यासाहेब महाजन, रामगोपाल नाबंदर, दामोदर भाले इत्यादींचा जंगी स्वागत करण्यात आले. या अधिवेशनात आर्थिक, राजकीय परिस्थिती संबंधी आणि सरकारी अन्यायाविरुध्द ठराव पास झाले. महाराष्ट्र परिषदेचे पाचवे अधिवेशन सेलू जिल्हा परभणी येथे दि. 24, 25 आणि 26 मे 1945 रोजी घेण्यात आले. या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. दिगंबरराव बिंदू होते. स्वागताध्यक्ष श्री. मुंकुंदराव पेडगावकर व स्वागत चिटणीस श्री. विनायकराव चारठाणकर होते. मराठवाडयातील सर्व जिल्हयातील प्रमुख नेते व कार्यकर्ते उपस्थित होते. अधिवेशनात जहागिरीचा शेतसारा, मराठी माध्यमाचा पुरस्कार, मालाला भाव, कुळांना

संरक्षण, मलि परिषद घेण्यात येवून स्त्री शिक्षण, हुंडाबंदी, गोषा पध्दती बंद करणे, स्त्रियांचे आरोग्य, शिशु संगोपन, स्त्रियांना नोकऱ्यात संधी इत्यादी विषयावर प्रकाश टाकणारी भाषणे झाली. मराठवाडयात स्त्री जागृतीची नवीन लाट निर्माण झाली. त्यातूनच 'महिला संगोपन' या नावाची स्वतंत्र संघटना स्थापन करण्यात आली.[24]

महाराष्ट्र परिषदेचे सहावे अधिवेशन लातूर येथे दि. 15, 16 व 17 मे 1946 रोजी घेण्यात आले. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री. फुलचंदजी गांधी तर अध्यक्ष श्री. आ. कृ. वाघमारे हे होते. मराठवाडयातून मोठया प्रमाणात शेतकरी, कामगार, विदयार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते. श्री. वाघमारे यांचे अध्यक्षीय भाषण अत्यंत जहाल व सरकार विरोधी होते. लातूरच्या मुख्य अधिवेशनाला जोडून किसान व शेतकऱ्यांचे स्वतंत्र मेळावे झाले. किसानाच्या मेळाव्यात श्री. आ. कृ. वाघमारे, श्री. शंभुगीर महाराज, श्री. व्यंकटराव जाधव व श्री. शुशालराव मोताळे यांची भाषणे झाली. या मेळयाव्याचे अध्यक्ष हैदराबादचे विदयार्थी नेत श्री. के. व्ही. नरसिंगराव होते. विदयार्थीच्या मेळयासमोर स. कृ. वैशंपायन, रामचंद्रराव नांदापूरकर यांची भाषणे झाली. या धिवेशनास भाई उध्दवराव पाटील यांचा फार मोठा सहभाग होता. उध्दवराव पाटलांनी शेतकऱ्यांची संघटना बांधून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चांगलेच रान उठविले होते.[25]

**मराठवाडा – (1948 ते 1960)**

मराठवाडा 17 सप्टेबर 1948 पासून 31 ऑक्टोबर 1956 पर्यत हैदराबाद राज्यात समाविष्ट होता. 1 नोव्हेबर 1956 पासून 30 एप्रिल 1960 पर्यत तो व्दिभाषीक मुंबई राज्यात समाविष्ट होता. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. तेव्हा पासून 'मराठवाडा' महाराष्ट्र राज्यात समाविष्ट असून ते आजतागायत कायम आहे. भारत सरकारने 13 सप्टेबर 1948 रोजी संस्थानावर लष्करी कारवाई केली. 17 सप्टेबर 1948 रोजी हैदराबादच्या निजामाने भारतीय लष्करापुढे शरणागती पत्कारली. 17 सप्टेबर 1948 पासून ते 30 नोव्हेबर 1949 पर्यत हैदराबाद राज्यात लष्करी प्रशासन होते. लष्करी प्रशासनापुढे शांतता, सुव्यवस्था, पुनर्वसनाचे कार्य, जहागिरी बरखास्त केल्या, जहागिरी खेडयाची मोजणी, कुळांना संरक्षण, जमिनीवरील हक्काची नोद, इंग्रजी ही प्रशासकीय भाषा, जमीन धारणेवर मर्यादा घातली, वेलोली मंत्रिमंडळ (1 डिसेंबर 1949 ते 5 मार्च 1952), संयुक्त महाराष्ट्र चळवळ, संयुक्त महाराष्ट्र सभा 1940, संयुक्त महाराष्ट्र समिती (1946 ते 1955), डॉ. राजेद्रप्रसाद यांनी 17 जून 1948 रोजी दार यांच्या अध्यक्षतेखाली" दार कमिशन नेमले, डिसेंबर 1953 मध्ये "राज्य पुनर्रचना आयोग' नियुक्त केला गेला.[26] जे. व्ही. पी. त्रिसदस्य समिती-1949, नागपूर करार-नागविरर्भ करार-1953, राज्य पुनर्रचना आयोग-1953, संयुक्त महाराष्ट्र समिती-1956, त्रिराज्य योजना-1955, व्दिभाषिक मुंबई राज्याची स्थापना-1956, महाराष्ट्र राज्याची निर्मिती या साठी कामगार चळवळीचा सहभाग-1926, राष्ट्रप्रेम व देशभक्तीचे धडे, वंदेमातरम सत्याग्रह-1938, स्टेट कॉग्रेसचा सत्यागृह-1938, वैयक्तिक सत्यागृहे-1940, 1942 चे आंदोलन, स्वामीजी हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाचे नेतृत्व, झेंडा सत्यागृह-1947, जंगलसत्यागृह-1947, असहकार चळवळ-1947, स्वामीजीची संसदेतील कामगिरी, हैदराबाद राज्याचे भाषिक तत्वावर विभाजन-1956, भूदान चळवळ-तेलंगणातील लढा-1952, 1956 साली स्वामीजीची मागणी पंडित नेहरुना मान्य करावीच लागली त्यामुळे हैदराबाद राज्यातील मराठी भाषिकांचा "मराठवाडा" व्दिभाषिक मुंबई राज्यात बिनर्शत सामील झाला. कन्नड

भाषिकांच्या प्रदेश कर्नाटकात व तेलगू भाषिकांचा प्रदेश आंध्रप्रदेशात विलीन करण्यात आला. पुढे 1 मे 1960 रोजी "महाराष्ट्र" आस्तित्वात आला.[27]

**निष्कर्ष**

महाराष्ट्रातील वैशिष्टयपूर्ण भूमी म्हणून मराठवाडयाची भूमी ही ओळखली जाते. या भूमीने प्राचीन काळापासून ते आजपर्यंत इतिहासाचे अनेक चढउतार पाहिले आहेत. प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडात मराठवाडयाने आपले ऐतिहासिक योगदान दिल्याचे दिसून येते. उत्तर भारतातील नंद व मौर्य या सत्तांचा मराठवाडयाशी संबंध असल्याचे स्पष्ट होते. सांतवाहन सम्राट पेठणचे त्यांनी इ. स. पू. 230 ते एकूण 460 वर्षे राज्य केले. वाकाटक घराणे इ.स. 250 ते 550 असे राज्य केले. राष्ट्रकूट घराणे-इ.स. 737 ते 974, बदामीचे पूर्वकालीन पश्चिमी चालुक्य, या बदामीच्या चालूक्याने इ.स. 550 ते 750 पर्यंत राज्य केले. कल्याणीचे उत्तरकालीन दक्षिणी चालूक्य यांनी इ.स. 850 पासून 1200 पर्यंत राज्य केले. वेंगीचे पूर्वी चालूक्य यांनी इ.स. 600 ते 1200 पर्यंत राज्य केले. उत्तर कल्याणीचे चालूक्य इ.स. 974 ते 1190 पर्यंत राज्ये केले. मध्ययुगी काळात मराठवाडयावर यादव घराणे देवगिरी इ.स. 860 ते 1318, मोगल कालीन मराठवाडा इ.स. 1600 ते 1724 पर्यंत ताब्यात होते. तर इ.स. 1724 पासून 17 सप्टेबर 1948 पर्यत हैदराबादच्या आसफिया घराण्याची सत्ता होती. आसफिया घराण्यात एकूण सात राजे झाले त्यांची नावे-निजाम-उल-मुल्क-आसफजाह 1724 ते 1748, मीर निजाम अली-1762 ते 1803, सिकंदरशहा-1803-1829, नसिर उद्दौला-1829-1857, अफजल उद्दौला-1857-1869, मीर महबुब अली-1869-1911, मीर उस्मान अली खान-1911-1948 पर्यंत होते. 224 वर्षे हैदराबादच्या आसफिया (निजाम) घराण्याचे राज्य मराठवाडा,तेलंगण आणि कर्नाटकावर होते. मीर उस्मान अली खान हा सातवा आणि शेवटचा निजाम होता.निजाम आणि मराठा यांच्यात सत्ताविस्तारासाठी अनेकदा मराठवाडा संघर्ष घडून आले. या संस्थानात निजामाने हुकुमशाही प्रवृत्तीनेच राज्यकारभार केला.संस्थानातील पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, सरदेशमुख व सरदेशपांडे या वतनदार मंडळीनी आणि जहागिरदारांनी मदत केली व पाठिंबा दिला. निजामाची विचारसरणी सरंजामदारी आणि हुकुमशाही प्रवृत्तीची होती. त्यामुळे संस्थानातील जनतेला राजकीय हक्क, अधिकार आणि स्वातंत्र्य असणे शक्यच नव्हते. निजाम सरकारचे दडपशाही धोरण, निजाम राजवटीत हिंदूना बळजबरीने मुस्लिम करण्यात येत होते. इस्मामी धार्मिक पध्दतीनुसार सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात सुध्दा उर्दू हीच महत्वाची भाषा होती. स्त्रियांच्या शिक्षणाला राज्यात प्रोत्साहन देण्यांत आलेले नव्हते. निजाम सरकाने मराठवाडयातील जमीनीवर अनेक जाचक निर्बध लावून जमीन महसूल वसूल केला होता. निजामकालातील समाजवयंवस्थेच्या मुख्य आधार वर्णव्यवस्था होती. मुस्लिम लोक हिंदू समाजातील लोकांचा स्पर्श टाळत असत. कुटुबात मुलीपेक्षा मुलाला अधिक महत्व असून स्त्रीयांना दुय्यम स्थान होते. समाजात शाकाहार आणि मांसाहार प्रचलीत होता. निजामकाळातील स्त्री आणि पुरुषांची केशभूषा आणि वेशभूषा साध्या स्वरुपाची होती. या संस्थातून मुक्त होण्यासाठी आर्य समाजानी आंदोलनाची उभारणी केली. सरकारच्या दडपशाहीस व अत्याचारास प्रतिकार केला. आर्यसमाजाचे सत्यागृह-1938, स्वातंत्र्य संग्रामातील पहिले बलिदान-वेदप्रकाशजी होते. महाराष्ट्र परिषद, पहिले अधिवेशन परतूर-1937, दुसरे अधिवेशन-लातूर-1938,

तिसरे अधिवेशन-उमरी-1941, चौथे अधिवेशन-औरंगाबाद-1943, पाचवे अधिवेशन-सेलू-1945, सहावे अधिवेशन-लातूर-1946, हैदराबाद मधील नेत्यांनी 29 जून 1938 रोजी हैदराबाद स्टेट कॉंग्रेस सत्यागृह-1938,1942 चे आंदोलन व मराठवाडा, कायदेभंगाची चळवळ-1947, झेंडा सत्यागृह-1947, जंगल सत्यागृह-1947-48, असहकार चळवळ-1947, सशस्त्र आंदोलन, लष्करी कॅपस, घातपातीकृत्य, महिलांचा सहभाग, कल्हाळीचा रणंसग्राम-1948, रझाकारांचे अन्याय व प्रतिकार, कॉग्रेसचे सशस्त्र आंदोलन 1948 संस्थानाचे संघराज्यात विलीनीकरण, याकार्यात स्वामी रामानंद तीर्थ, गार्विंदभाई श्रॉफ, दिगबरराव बिंदू, श्री. आ. कृ. वाघमारे, गोविंदरांव नानल, एच. रामकिशन धुत, रविनारायण रेडी, श्रीनिासराव बोरीकर, जनार्दनराव देसाई, नारायण जोशी, बाबासाहेब परांजपे, हिरालाल कोटेया, मोतीलाल मंत्री, आर. डी. देशपांडे, राघवेंद्र दिवाण, माणिचंद पहाडे, गुलाबचंद नागोरी, अण्णासाहेब वाळुजकर, अच्यूतभाई देशापांडे, तात्यासाहेब महाजन, रामगोपाल नावंदकर, नागोराव पाठक, ज. प. मुळे, गोपाळशास्त्री देव, अच्युतराव खोडवे, माधव बक्षी, व्यंकट बा. जोशी, देवरावजी चव्हाण, रंगनाथ कुलकर्णी, अशा महान व्यक्तीं सहभाग नोंदविला होता.

दक्षिणेत आल्यानंतर मीर कमरुद्दीनने मराठयांमध्ये असलेल्या दुहीचा फायदा घेतला.मराठयात शाहू व ताराबाई यांच्यातील सत्ता संघर्षाला सुरुवात झालेली होती. मोगल काळात दक्षिण प्रांत खानदेश, वऱ्हाड, औरगाबाद, विजापूर, बीदर व हैदराबाद अशी सहा सुभे होते. निजाम व मुबारिझखान यांच्यात बुलढाणा जिल्हयात साखरखेडा येथे 1 ऑक्टोबर 1724 मध्ये लढाई झाली. त्यात मुबारिझखानाचा पराभव झाला. 12 ऑक्टोबर 1800 मध्ये निजाम व ईस्ट इंडिया कंपनी यांच्यात करार झाला. विल्यम पामर नावाच्या इंग्रजाने निजाम राज्यात कर्ज देण्यासाठी पामर कंपनी नावाची पेढी उघडली. कर्ज फेडीसाठी 30 लाखाचे उत्पन्न असलेले वऱ्हाडमधील जिल्हे पामर कंपनीला लावून देण्यात आले. धर्माजी प्रतापरावचे बंड-1818, नौसाजी नाईकांचे बंड-1919, उदगीरमधील शिवलिंगय्या देशमुखाचे बंड-1820, औरंगाबादमधील भिल्लांचा बंदोबस्त-1919-1843, परभणी जिल्हयातील बंड-1830-1855, नांदेड जिल्हयातील बंड, उस्मानाबाद जिल्हयाती बंड-1832,1857 चा उठाव व हैदराबादचे संस्थान, औरंगाबाद येथील सैनिकाचे उठाव-1857, हैदराबादच्या रेसीडेन्सीवर हल्ला-17 जुलै 1857, हैदराबाद संस्थानातील क्रांतिकारी चळवळी आणि मराठवाडा, क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके, बाळकृष्णं हरी चाफेकर, हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे हैदराबाद स्वातंत्र्य आंदोलनातील हुतात्म्यांचा अग्रणी बनण्याचा मान यांनी मिळविला.

हैदराबाद संस्थान हे सर्वात मोठे संस्थान असल्याने इंग्रजांनी या संस्थानात जातीने लक्ष घातले. राजा मुसलमान व बहुसंख्य प्रजा हिंदू त्यामुळे या संस्थानात हिदू-मुस्लिम जातीयतेचे विष पेरण्यात आले. भारतीय स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे लोण संस्थानात पसरु नये म्हणून मुल्की व पोलिस खाते ब्रिशि अमंलदाराकडे देण्यात आले. संस्थानाबाहेर उमटणाऱ्या राष्ट्रीय चळवळीचे पडसाद रोखण्याचा दीर्घकाळ प्रयत्न करण्यात आला. हैदराबाद संस्थानात कन्नड, तेलगू, मराठी भाषा बोलणारे लोक होते. या प्रदेशात भिन्न भाषा, भिन्न संस्कृती व भिन्न आचार होते. सरकारी भाषा उर्दू होती. शासनाच्या नोकरीत बहुसंख्याक मुसलमान होते. धार्मिक स्वातंत्र्य नव्हते, सर्वत्र मुस्लिम जातीयतेचे थैमान होते. मुस्लिम गुंड व अधिकारी यांच्या छळाला आणि पिळवणूकीला जनता बळी पडत होती. लढयाच्या शेवटच्या काळात रझाकारांनी

संपूर्ण संस्थानभर थैमान घातले होते. हिंदू प्रजा रझाकारांच्या अन्यायाला कंटाळून गेली होती. अशा परिस्थितीत संस्थानातील प्रजेची सहनशीलता पराकोटीला जाऊन पोचली. त्यातूनच या आन्याया विरुध्द रणशिंग फुंकण्याची भावना संस्थानातील प्रजेत निर्माण झाली. 1938 पासुन 1948 पर्यंत हैदराबाद मुक्तिसंग्रामाने विविध वळणे घेतली. संस्थानातील जनतेचा प्रबंळ हुंकार निजामी सरकार, रझाकार संघटना व हैदराबांद कॉन्टिन्जेट यांना संपुष्टात आणता आला नाही. संस्थानातील जनतेनी आपल्या प्रबळ इच्छाशक्तीवर हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करण्यास अखेरीस निजामाला भाग पाडले. वरील विश्लेषणावरुन निजामाकालीन मराठवाडयाचे राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक चित्र लक्षात येते.

**संदर्भसूची**


१. डॉ. अनिल कठारे, डॉ. महादेव वाघमारे हैदराबाद स्वातंत्र्य-संग्राम आणि मराठवाडयातील दलित समाज, कल्पना प्रकाशन, नांदेड, 2006 पृष्ठ 11

२. अमृत गडकरी, मंतरलेले पाणी (हैदराबाद मुक्तिसंग्राम-समाजवादी उठाव), साधना प्रकाशन, पुणे, 1 ऑगस्ट 1990 पृष्ठ 1

३. डॉ. अनिल कठारे, डॉ. किशन केंद्रे, हैदराबाद संस्थान आणि महात्मा गांधी, पुनम प्रकाशन, कंधार, ऑक्टोबर 2009, पृष्ठ 9

४. डॉ. अनिल कठारे, डॉ. नगराळे, कल्पना प्रकाशन, नांदेड, नोव्हेबर 1999 पृष्ठ 211

५. अनंत भालेराव, हैदराबाचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन गृह, मुंबई, 17 सप्टेंबर 1987, पृष्ठ 8, 9

६. कित्ता, पृष्ठ 23

७. कित्ता, पृष्ठ 25

८. डॉ. सोमनाथ रोडे, मराठवाडयाचा इतिहास विदया बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून 1999 पृष्ठ 109

९. कित्ता, पृष्ठ 111

१०. पुर्वोक्त पृष्ठ 200

११. पुर्वोक्त पृष्ठ 202

१२. डॉ. पी. व्ही. काटे, मराठवाडयाचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, जून 199, पृष्ठ 100

१३. कित्ता, पृष्ठ 109

१४. कित्ता, पृष्ठ 119

१५. डॉ. अनिल कठारे, मराठवाडयाचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स औरंगाबाद, जुलै 2013, पृष्ठ 144

१६. डॉ. एम. एम. भांडवलकर, प्रा. यु. एस. हनवते, मराठवाडयाचा इतिहास, अभिजीत पब्लिकेशन लातूर जून 199 पृष्ठ 83

१७. कित्ता, पृष्ठ 84

१८. प्रा. डॉ. चंद्रशेखर लोखंडे, मराठवाडयाचा मुक्ती लढा आणि हैदराबाद संस्थान, विदयाभारती प्रकाशन, लातूर. पृष्ठ 27

१९. कित्ता, पृष्ठ 30

२०. कित्ता, पृष्ठ 31

२१. प्रा. द. पं. जोशी (संपादक) काळाच्या पडदयाआड खंड निष्टा मराठी साहित्य परिषद आंध्र प्रदेश हैदराबाद 1992 पृष्ठ 298

२२. डॉ. भ. ग. कुटे, स्वातंत्र्य-सैनिक चरित्रकोश-महाराष्ट्र राज्य मराठवाडा विभाग, शासकीय मध्यवर्ती, मुद्रणालय, मुंबई, 1976 पृष्ठ 265

२३. सौ. प्रमोदिनी दिनकर बिंदू, हैदराबाद राज्याचे विसर्जन, साकेन प्रकाशन, औरंगाबाद 1986 पृष्ठ 114

२४. डॉ. अनिल कठारे, डॉ. महादेव वाघमारे, हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडयातील दलित समाज, कल्पना प्रकाशन, नांदेड 2006 पृष्ठ 23

२५. डॉ. अनिल कठारे, मराठवाडयाचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद जुलै 2013 पृष्ठ 146

२६. पुर्वोक्त, मराठवाडयाचा इतिहास, पृष्ठ 108

२७. पुर्वोक्त, मराठवाडयाचा इतिहास, कांटे, पृष्ठ 130